**लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक :- दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि. क. २**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- ०५ ऑक्टोबर, २०२१.

**वाचा:-**

(१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६

(२) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सबळीकरण मंत्रालयाचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३४-०२/२०१५-डीडी-तीन, दि.२९.०८.२०१८

**प्रस्तावना :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार दिव्यांग व्यक्तींना शालेय, महाविद्यालयीन, पूर्व प्रवेश परीक्षा तसेच स्पर्धा परीक्षेसाठी लेखनिक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि अशा सूचना संबंधीत प्राधिकाऱ्यांना वेळोवेळी देऊनही दिव्यांग व्यक्तींना लेखनिक उपलब्ध करुन देताना समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दि.२९.०८.२०१८ च्या कार्यालयीन आदेशांच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागातील दि.१८.०३.२०१४ च्या परिपत्रकामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वेळोवेळी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विचार करुन उपरोक्त दि.१८.०३.२०१४ चे परिपत्रक अधिक्रमित करुन नव्याने सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

केंद्र शासनाने दि.२९.०८.२०१८ नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची सुधारित मार्गदर्शिका निर्गमित केली आहे. त्याच धर्तीवर, केंद्र शासनाची मार्गदर्शिका स्विकृत करुन महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षा यांचेकरिता लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका खालीलप्रमाणे सुचित करण्यात येत आहे.

१. सदर मार्गदर्शिकेस "लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका, २०२१" असे संबोधण्यात यावे.
२. तंत्रज्ञानामध्ये झालेली सुधारणा लक्षात घेऊन लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींकरिता नवीन मार्ग खुले असल्याचे विचारात घेता, लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना इतरांसोबत समान स्तरावर लेखी परीक्षा देण्याबाबतची संपूर्ण देशभरात एकसारखी व व्यापक मार्गदर्शिका असण्याबाबतचे धोरण असणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या

व्यक्तीनुरुप विशिष्ट गरजांचा समावेश करण्याच्या दृष्टीने धोरणामध्ये लवचिकता असण्याची आवश्यकता आहे.

३. नियमित लेखी परीक्षा व स्पर्धा परीक्षा यांच्याकरिता स्वतंत्र निकष असण्याची गरज नाही.

४. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारीमधील अंधत्व / शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित / नसलेले) / मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परिक्षार्थींना लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या इतर प्रकारांतील दिव्यांग परिक्षार्थींच्या बाबतीत, संबंधित दिव्यांग व्यक्तीने लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर दिव्यांग परिक्षार्थीस गरज व आवश्यकतेनुसार परीक्षा देताना लेखनिक / वाचक /प्रयोगशाळा सहाय्यक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात यावी.

५. परीक्षा देणारा लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेला परिक्षार्थी आपल्या सद्सद्विवेक बुध्दीने लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची निवड करेल अथवा परीक्षा मंडळाकडे याबाबतची विनंती करेल. परीक्षेच्या आवश्यकतेनुसार परीक्षा मंडळ जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर व राज्य स्तरावर लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची यादी तयार ठेवतील. अशा उदाहरणांत, लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवारास परीक्षा मंडळातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांस परीक्षेपूर्वी दोन दिवस अगोदर भेटून सदर लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक स्वत:साठी सुयोग्य आहेत याबाबतची पडताळणी करण्याची संधी देण्यात यावी.

६. परीक्षा मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असल्याबाबतची तसेच सदर लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता इ.१० वी किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतची खात्री करावी.

संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास स्वत: लेखनिक/ वाचक/प्रयोगशाळा सहाय्यक याची व्यवस्था करण्यास मान्यता दिली असल्यास अशा परिस्थितीमध्ये **लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी**. लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवाराने विहित नमुन्यात **(Appendix-II)** लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची माहिती परीक्षा मंडळाकडे द्यावी.

७. लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारांकरीता विशेष सूचना:-

७.१ दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि/अथवा उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास लेखनिकाची मदत अनुज्ञेय आहे. यास्तव, लेखनिकाने दिव्यांग

उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने उत्तर छायांकित करण्यास/लिहीण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

७.२ लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी छायांकित करणे/लिहीणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप /मार्गदर्शन/सूचना करू नये. तसेच परीक्षा मंडळाने प्रत्येकी ५ उमेदवारांकरीता (लेखनिकासह) एक समवेक्षक या प्रमाणात समवेक्षकाची नेमणुक करुन उमेदवाराने सांगितलेले उत्तरच लेखनिकाने विहीत ठिकाणी छायांकित/लिहिलेले आहे याची **खातरजमा** करावी.

७.३ लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा/गप्पा करु नयेत. तसेच इतर लेखनिक/उमेदवार यांच्याशी बोलू नये.

७.४ दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना परीक्षांचे सर्व नियम /सूचना जशाच्या तसे लागू असतील.

७.५ उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसचे लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

८. आपत्कालीन परिस्थितीमध्ये परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या बदलणेबाबत लवचिकता असावी. वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी मुख्यत्वेकरुन भाषाविषयक पेपरसाठी वेगवेगळे लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक नियुक्त करण्याची संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास परवानगी राहील. तथापि एका विषयाकरिता एकच लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक वापरता येईल.

९. परीक्षेचे माध्यम (उदा. सर्वसाधारण / ब्रेल लिपी / संगणकाद्वारे / ध्वनीमुद्रण / ठळक व मोठ्या अक्षरातील प्रती) स्विकारण्याचा पर्याय संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास उपलब्ध करावा जेणेकरुन परीक्षा मंडळास सुलभरित्या तंत्रज्ञानाचा वापर करुन परीक्षा पेपरचे रुपांतर मोठ्या व ठळक अक्षरातील प्रतीमध्ये / ई-टेस्ट / ब्रेल लिपी / ब्रेल मजकुराचे रुपांतर इंग्रजी व प्रादेशिक भाषांमध्ये करणे सोईचे होईल.

१०. संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास संगणकीय प्रणालीद्वारे परीक्षा देण्याची मुभा देण्यात आली असल्यास अशा परिस्थितीत संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास परीक्षेच्या एक दिवस अगोदर संबंधित संगणकीय प्रणालीची पाहणी व तपासणी करण्याची परवानगी देण्यात यावी. जेणे करुन त्याला जर संगणक प्रणाली हाताळणी करण्यामध्ये काही समस्या असतील तर त्याचे निराकरण त्यास करता येईल. परंतू स्वत:चा संगणक/लॅपटॉप परीक्षेस वापरण्याची परवानगी देण्यात येऊ नये. तरीदेखील, लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींकरिता दिव्यांग-स्नेही व वैशिष्टयपूर्णरित्या बनविण्यात आलेले की-बोर्ड, माऊस अशी उपकरणे वापरण्यास परवानगी राहील.

११. लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक पुरविण्याची प्रक्रिया सुलभ असावी तसेच सदर प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या माहितीची नोंद परीक्षेचा अर्ज भरण्याच्या वेळी घेण्यात यावी. परीक्षा मंडळाने लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीने मागणी केल्यानुसार

परीक्षेचे माध्यम तसेच दिव्यांग व्यक्तीसाठी सुयोग्य अशी बैठक व्यवस्था पुरविलेबाबत खात्री करावी.

१२. कोणत्याही ठिकाणच्या सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राचा स्विकार देशभरात करण्यात यावा.

१३. लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना देण्यात येणाऱ्या जादा वेळेबाबत सद्यस्थितीत प्रचलित असलेला "शब्द,"**परीक्षेकरिता जादा वेळ/अतिरिक्त वेळ**" याऐवजी "**भरपाई वेळ**" असा बदलण्यात यावा. तसेच लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक वापरण्यास परवानगी देण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) **दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना देण्यात येणारा सदरचा भरपाई वेळ हा प्रति तास वीस मिनिटे यापेक्षा कमी नसावा.** लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या सर्व परिक्षार्थींना लेखनिक / वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक वापरण्यास परवानगी देण्यात आलेली नसली तरी अशा परीक्षार्थींना भरपाई वेळ हा तीन तासामागे एक तास अधिक याप्रमाणे देण्यात यावा. जर परीक्षेचा वेळ एक तासापेक्षा कमी असल्यास भरपाई वेळ हा त्या प्रमाणात (pro-rata basis) देण्यात यावा. तथापि सदर वेळ हा पाच मिनिटांपेक्षा कमी नसावा व पाच मिनिटांच्या पटीत सदर वेळ देण्यात यावा.

१४.लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवारास परीक्षेसाठी आवश्यक असणारी सहाय्यक उपकरणे जसे बोलणारा कॅलक्युलेटर (ज्या परीक्षापध्दतीत कॅलक्युलेटर वापरण्याची परवानगी आहे अशा बाबतीत), टेलर फ्रेम, ॲबॅकस, ब्रेल पाटी, भूमितीय कीट, ब्रेल मोजमाप पट्टी, सुसंवादवर्धक उपकरणे जसे की कम्युनिकेशन चार्ट, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, इ. आवश्यकतेनुसार वापरण्याची परवानगी असावी.

१५. परीक्षेच्या वेळी होणारा उमेदवाराचा संभ्रम व गोंधळ टाळण्यासाठी परीक्षेपूर्वी योग्य अशी स्वतंत्र बैठक व्यवस्था (प्राधान्याने तळमजल्यावर) लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थींसाठी करण्यात यावी. उमेदवारास प्रश्नपत्रिका दिल्याच्या वेळेची नोंद अचूकपणे घेतल्याबाबतची तसेच त्यांना वेळेवर पुरवणी पत्रिका पुरविण्यात आल्याबाबतची खात्री करावी.

१६. परीक्षा मंडळ शक्यतेनुसार वाचनसाहित्य ब्रेल लिपीमध्ये पुरवेल किंवा ई-टेस्ट किंवा संगणक ज्याच्यामध्ये सुयोग्य असे स्क्रीन रिडींगचे सॉफ्टवेअर संलग्न करुन त्याचा वापर खुली पुस्तक परीक्षा (Open Book Exam) घेण्याच्यादृष्टीने करेल. त्याचप्रमाणे ऑनलाईन परीक्षा ही लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थींसाठी वापरास सुगम्य असावी. उदा. वेबसाईट, प्रश्नपत्रिका व इतर अभ्यास साहित्य हे आंतरराष्ट्रीय मानकांनुसार प्रमाणित व सुगम्य असावेत.

१७. ज्याप्रमाणे सद्यस्थितीतील धोरणानुसार अंध परिक्षार्थींना आकृती व आलेखाऐवजी इतर वैकल्पिक प्रश्न उपलब्ध करुन देण्यात येतात त्याचप्रमाणे लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या कर्णबधीर परिक्षार्थींसाठी वर्णनात्मक प्रश्नांऐवजी इतर वैकल्पिक प्रश्न उपलब्ध देण्यात यावेत.

१८. शक्यतोवर सर्व दिव्यांग परिक्षार्थींच्या परीक्षा या तळमजल्यावर घेण्यात याव्यात. तसेच **परीक्षा केंद्रे ही दिव्यांग व्यक्तींनी वापरण्याच्या दृष्टीने सुलभ व सुगम्य असावीत.**

२. सदर शासन परिपत्रक संबंधीत मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका,

जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम व सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था यांच्या तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी, पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आयुक्त, समाज कल्याण, आयुक्त, दिव्यांग कल्याण, व संचालक (बहुजन कल्याण विकास विभाग) यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक व सर्व प्रकारच्या संस्था यांना तातडीने पाठवावे आणि वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन करण्यात आलेले असुन त्याचा संकेतांक क्र. २०२११००५१५०४४६२३२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DINESH RAMCHANDRA DINGLE

Digitally signed by DINESH RAMCHANDRA DINGLE
DN: CN = DINESH RAMCHANDRA DINGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT
Date: 2021.10.05 15:08:22 +05'30'

**( दि. रा. डिंगळे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अ.मु.स/प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१०.सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग,
११.आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे
१२.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१४.सर्व जिल्हाधिकारी,
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
१७.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
१८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१९.सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,
२०.सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,

२१.सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२५. सर्व कार्यासने,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२६.निवड नस्ती, दिव्यांग कल्याण-२.

## APPENDIX - I

## Certificate regarding physical limitation in an examinee to write

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs …………………………………………………………(Name of the Candidate with disability), a person with …………………………………………………………… (Nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o………………………………………, a resident of ………………………………………………………………………………………(Village/District/State) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

Signature

Chief Medical Officer/Civil Surgeon/Medical Superintendent of

a Government health care institute

Name and Designation

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:-

Date:-

Note:- Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment – Ophthalmologist, Locomotor disability – Orthopaedic specialist/PMR).

**APPENDIX - II**

## Letter of Undertaking for Using Own Scribe

I……………………………………………………………………, a candidate with …………………………………(Name of the disability) appearing for the ……………………………………………………………………………(Name of the examination) bearing Roll No………………..at…………………………………………………………………………(Name of the Sub-Centre) in the District……………………………, Maharashtra. My qualification is………………………………….

I do hereby state that………………………………………………………… (Name of the Scribe) will provide the service of Scribe/Reader/Lab Assistant for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his qualification is …………………………………………………In case, if it is found that scribe's qualification is not as declared by the undersigned or is equal to or higher than my qualification or if found to be more than or equal to the minimum qualification criteria of the examination. I shall forfeit my right to the post and claims relating thereto.

(Signature of the candidate with Disability)

Place:-

Date:-

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार महसूल व वन विभागातील, महसूल आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील पदांकरीता दिव्यांगासाठी शासन सेवेत पदे सुनिश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.७९/ई-१अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- २९ जून, २०२१

**वाचा** :- १) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनिमय, २०१६
२) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि.०४.०१.२०२१ ची अधिसुचना.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.दिव्यांग २०१९/प्र.क्रक.२५१/ दि.क.२, दि.१२.११.२०२०
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.दिव्यांग २०१९/प्र.क्र.२५१/ दि.क्र.२, दि.०२.०२.२०२१

**प्रस्तावना :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३३ नुसार दिव्यांगासाठी शासन सेवेतील पदांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाने दि.०४.०१.२०२१ च्या अधिसुचनेन्वये दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेल्या पदांची यादी करुन सदर यादी केंद्र शासनाच्या www.disabilityaffairs.gov.in या संकेतस्थळावर Policy/Act/Rules-Notification येथे List Of Post Identification suitable for Persons with Benchmark Disability notified on ०४.०१.२०२१ या शिर्षाखाली प्रसिध्द केली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.०७.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, राज्य शासनाच्या आस्थापनेवरील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्याबाबतच्या सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयातील निर्देशास अनुसरुन महसूल विभागाच्या अधिनस्त आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील पदांकरीता दिव्यांगासाठी शासन सेवेत पदे सुनिश्चित करणे, तसेच ३ वर्षापेक्षा जास्त नसेल इतक्या नियत कालांतराने दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेल्या शासन सेवेतील जागांच्या यादीचे पुनर्विलोकन करुन सदर पदे नव्याने दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३३ नुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील दिव्यांगसाठीची पदे सुनिश्चित करण्यासाठी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि.०४.०१.२०२१ च्या अधिसुचनेन्वये दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेल्या पदांची यादी प्रसिध्द केलेली आहे. त्यामध्ये नमुद केल्यानुसार केंद्र शासनाने पदसुनिश्चिती करुन दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित केलेली गट-अ ते गट-ड मधील जी

पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर आहेत अशा पदांबाबत, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या यादीतील ज्या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप व प्रचलित वेतनश्रेणी राज्य शासन सेवेतील पदांशी समान आहेत अशा पदांची पदनामे जरी भिन्न असली तरी राज्य शासन सेवेतील ती पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित राहतील, तसेच राज्य शासनाच्या आस्थापनेवरील उपरोक्त पदांव्यतिरीक्त जी पदे अस्तित्वात आहेत, अशा पदासंदर्भात दिव्यांगासाठी पदसुनिश्चितीचा प्रस्ताव संबंधित विभागांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १२.११.२०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये गठीत केलेल्या तज्ञ समितीसमोर पाठवावेत, अशा सुचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.०२.०२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आहेत.

२. त्यास अनुसरून केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या दि.०४.०१.२०२१ रोजीच्या अधिसुचनेतील दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेल्या गट-अ ते गट-ड संवर्गाकरिता प्रसिध्द केलेल्या यादीतील पदे विचारात घेऊन, तसेच महसूल विभागातील पदांबाबत सामाजिक न्याय विभागांतर्गत तज्ञ समितीच्या दिनांक २२ व २३ फेब्रुवारी, २०२१ व दि. २१ जून, २०२१ रोजीच्या बैठकीत शिफारस केल्यानुसार महसूल विभागातील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदाकरीता **विवरणपत्र-अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिव्यांगासाठीची पदे सुनिश्चित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि.०४.०१.२०२१ ची अधिसुचना व सामाजिक न्याय विभागाच्या दि.०२.०२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२१०६२९१६५४३५२६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madhav Veer

Digitally signed by Madhav Veer
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forests Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b8bcafe4a890e79ceaf1ea38b990e1e22edaeda6d9d0b7d64088adc780cd25e6, serialNumber=3c0e93ab894790967228875f0b4fd8c2fda8590b77ae2ea700bf19e91a673afc, cn=Madhav Veer
Date: 2021.06.29 17:04:01 +05'30'

**सहपत्र :- विवरणपत्र-अ**

**( डॉ. माधव वीर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यामंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. विधानसभा/ विधान परिषद सर्व सदस्य, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

९. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

११.सर्व विभागीय आयुक्त.

१२.सर्व जिल्हाधिकारी.

१३.सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४.कक्ष अधिकारी ( ई-१, ई-२, ई-३,ई-७ ई-९ ई-१०), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५.निवडनस्ती / कार्यासन ई-१ (अ).

# महसूल व वन विभाग

## दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३३ नुसार, महसूल विभागातील दिव्यांगांसाठी गट-अ ते गट-ड या संवर्गातील पदांची पदसुनिश्चिती करणेबाबत.

## " विवरणपत्र - अ "

| अ.क्र | पदनाम | शारिरीक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| **गट- अ** | | | |
| १ | अपर जिल्हाधिकारी | S, ST, W, BN, RW. SE, H, C. | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| २ | उप जिल्हाधिकारी | S, ST, W, BN, RW. SE, H, C. | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| ३ | तहसिलदार | S, ST, W, BN, RW. SE, H, C. | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| **गट- ब (राजपत्रित)** | | | |
| ४ | नायब तहसिलदार | S, ST, W, BN, RW. SE, H, C. | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, OAL, CP, LC, DW, AAV,<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| **गट- ब (अराजपत्रित)** | | | |
| ५ | स्विय सहायक / लघुलेखक (उच्चश्रेणी ) | S, ST, W, L, RW, SE, H, C, | a) B, LV<br>c) OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV,<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| ६ | स्विय सहायक / लघुलेखक ( निन्मश्रेणी ) | S, ST, W, MF, SE, H, | a) B, LV<br>c) OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV,<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

| गट- क | | | |
|---|---|---|---|
| ७ | **मंडळ अधिकारी** | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, SE, H, C, | a) LV<br>b) HH<br>c) OA, OL, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), , SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| ८ | **अव्वल कारकून** | S, ST, W, RW, H, C, MF, | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL BA,, BL, OAL, CP, LC, Dw, AAV,<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| ९ | **लिपिक टंकलेखक/ महसूल सहायक** | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, BL, BA, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d), ASD (M,MoD), ID, SLD MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| १० | **तलाठी** | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, SE, H, C, | a) LV<br>b) HH<br>c) OA, OL, LC, DW, AAV<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| **गट- ड** | | | |
| ११ | **शिपाई** | S, ST, W, L, KC, PP, MF, RW, SE, C | a) B, LV<br>b) D, HH,<br>c) OA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV,<br>d), ASD (M,MoD), ID, SLD MI<br>e) MD involving (a) to (d) above |

Abbreviations :-

| Sr. No. | Abbreviation | Long Form | Sr. No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | B | Blind | ९ | DW | Dwarfism |
| २ | LV | Low Vision | १० | AAV | Acid Attack Victim |
| ३ | D | Deaf | ११ | ASD | Autism Spectrum Disorder (M-Mild) |
| ४ | HH | Hearing Handicapped | १२ | ID | Intellectual Disability |
| ५ | OL | One Leg | १३ | SLD | Special Learning Disability |
| ६ | OAL | One Arm and One Leg | १४ | MI | Mental Illness |
| ७ | CP | Cerebral Palsy | १५ | MD | Multiple Disabilities |
| ८ | LC | Leprosy Cured. | १६ | M MoD | Mild Moderate |

Abbreviations :-

| Sr. No. | Abbreviation | Long Form | Sr. No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | S | Sitting | ७ | PP | Pulling and Pushing |
| २ | ST | Standing | ८ | MF | Manipulation With Fingers |
| ३ | W | Walking | ९ | SE | Seeing |
| ४ | BN | Bending | १० | H | Hearing |
| ५ | L | Lifting | ११ | C | Communication |
| ६ | KC | Kneeling & Crouching | १२ | RW | Reading & Writing |

GR-200407151630240001-0100

**अपंग व्यक्तींना शासकीय व शासनाच्या अधिपत्याखालील सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंबंधात उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १६ जून, २००१.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दि.२३.५.७८.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही-१०८१/३२७३/१६-अ, दि.१.३.८३.

**शासन निर्णय**

अपंग व्यक्तींकरीता शासकीय सेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क आणि गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये उच्च वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली होती. तसेच संदर्भाधिन क्र.२ च्या आदेशान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेमधील लिपिक वर्गीय पदांच्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी अपंग उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा १० वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

२. तथापि गट-अ आणि गट-ब मधील पदांसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्यात आलेली नव्हती. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील कलम ३८ (१) (बी) नुसार अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्याची तरतूद विहित करण्यात आली असल्यामुळे अपंग व्यक्तींची शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्ती करताना उच्च वयोमर्यादेत देण्यात आलेल्या सवलतीत एकसूत्रता असावी, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. यासंदर्भात शासनाचे आदेश आहेत की, राज्य शासनाच्या सेवेतील व राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-अ ते गट-ड मधील पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा अन्य मार्गाने केल्या जाणा-या सरळसेवा नियुक्तीसंबंधात अपंग व्यक्तींसाठी उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात यावी.

ही सवलत आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल. त्यामुळे या विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ व २ च्या आदेशानुसार देण्यात आलेल्या उच्च वयोमर्यादेच्या सवलती या आदेशाच्या दिनांकापासून आपोआप रद्द होतील.

४. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहतील.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(द. दा. देशपांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

[illegible]

उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री,राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* प्रबंधक,उच्च न्यायालय,मूळ न्याय शाखा,मुंबई,
* प्रबंधक,उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई,
* प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
* प्रबंधक,लोकआयुक्त व उप लोकायुक्त,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई,
* सचिव,राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई,
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२,नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी व लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महापालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीपत्रक काढण्याच्या विनंतीसह)
उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
आयुक्त, अपंग कल्याण, ३ चर्च रोड, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

**दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित करणे व आरक्षण अमंलबजावणीची कार्यपध्दती......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड
दिनांक - २९ मे, २०१९

**वाचा** :- (१) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे,१९७८
(२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०८१/प्र.क्र.१५/९९/१६-अ, दिनांक ७ सप्टेंबर, १९८२
(३) शासन निर्णय समाजकल्याण, संसकृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इडीडी १०९० २२५९२/सिआर ४००/सुधार-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९२
(४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९७/सीआर-२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, १९९७
(५) शासन परिपक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ दिनांक ०२ मे, १९९८
(६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/प्र.क्र.१०३८(भाग ३)/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७
(७) दिव्यांगांचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर, २०१६
(८) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची दिनांक १५ जून, २०१७ ची अधिसूचना
(९) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६०३५/०२/२०१७ (आस्था), दिनांक १५ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ३३ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी गट अ ते ड मधील पदावर नियुक्तीसाठी ३% आरक्षण दिनांक २ मे, १९९८ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक २०.११.१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंगासाठी गट क व ड च्या सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीसाठी ३% आरक्षण लागू करण्यात आले होते. केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असून अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५.६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेले आहे. केंद्र शासनाने दिनांक १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह

एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४ % आरक्षण विहित केलेले आहे.

मंत्रिमंडळाने दिव्यांग व्यक्तींसाठींच्या महाराष्ट्र राज्य धोरणास मान्यता दिली असून त्यामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अनुसार दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या सेवेतील आरक्षणाचा समावेश आहे. त्यानुसार शासन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः-**

१. दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २ (r) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, दिव्यांग व्यक्तींसाठी शासन सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमूद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% तसेच गट ड व इ साठी १% या प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध /अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायु विकृती (muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर

२. **पदांची गणना** :- गट क व गट ड मधील पदांची गणना करतांना, त्या भरती वर्षातील त्या त्या गटातील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या संख्येवर निश्चित करावी. असे करतांना त्या त्या गटातील दिव्यांगासाठी एकाच आस्थापनेतील सुनिश्चित करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे व सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत. परंतु जेव्हा सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील पदांची संख्या मोठी राहील अशा वेळी ज्या संवर्गाची पद संख्या व रिक्त पदे कमी आहेत असा संवर्ग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावा. गट क संवर्गातील तीन विविध पदनाम असलेल्या पदावर पदभरती करावयाची असल्यास त्यातील एक पद अपंगासाठी सुनिश्चित नसल्यास उक्त पदातील रिक्त पदावरील

आरक्षणाची ४% पदे अन्य दोन संवर्गात घेण्यात यावीत.उदाहरणार्थ लिपिक, वरिष्ठ लिपिक व वनपाल अशी तीन पदावर पद भरती करतांना वनपाल पद सुनिश्चित नसल्यास, वनपाल या संवर्गाची रिक्त पदाची संख्या अन्य दोन संवर्गापेक्षा मोठी असल्यास उर्वरित दोन संवर्गातील ज्या पदाची रिक्त पदाची संख्या कमी असेल त्या संवर्गाची पदे दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात यावी. असे करत असताना विहित आरक्षणाचे प्रमाण ओलांडले जाईल. भरतीसाठी ७ रिक्त पदे उपलब्ध होत असल्यास त्यातील १ पद दिव्यांगासाठी आरक्षित करावे. ७ पेक्षा जास्त पदे भरतीसाठी उपलब्ध होत असल्यास विहित आरक्षणाप्रमाणे पद गणना करावी.

विहित दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी गट “अ” व “ब” च्या सरळसेवेच्या कोट्यातील पदासाठी आरक्षणाची पदे निश्चित करतांना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात रिक्त पदावर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच (सरळ सेवेच्या कोट्यातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

३. **पद सुनिश्चितीकरणास अपवाद :-** उपरोक्त तरतुदीनुसार एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या शासकीय विभागास वा आस्थापनेस अथवा संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुनिश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह व अपंग आयुक्त यांच्या शिफारशींसह संबंधीत प्रशासकीय विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करावेत. तसेच यापूर्वी अपवाद करण्यात आलेल्या संवर्गासाठी / पदांसाठी पुन:श्च मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

४. **अनारक्षित पदावर दिव्यांग व्यक्तींची नियुक्ती :-** दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरविता येणार नाही. जर दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

५. **दिव्यांगाचे प्रमाणपत्र** - दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त

प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहतील. दिव्यांगाचे प्रमाणपत्र बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६. **वयोमर्यादा :-** दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवा प्रवेशासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ जून २००१ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा कायम ठेवण्यात येत असून ती वय वर्षे ४५ इतकीच राहील.

७. **बिंदूनामावली (रोस्टर) राखणे** :- प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील प्रत्येक संवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती सरळ सेवा भरतीच्या पदासाठी १०० बिंदू नामावलीची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यापूर्वी ३ % आरक्षणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीसाठी बिंदू नामावलीतील बिंदू क्रमांक १, ३४ व ६७ निश्चित करण्यात आले होते. परंतु आता दिव्यांगाच्या ४ वर्गवारी असल्याने व बिंदूनामावली राखण्यास सुसूत्रता यावी म्हणून बिंदू क्रमांक १, २६, ५१ व ७६ बिंदू निश्चित करण्यात येत आहेत.

वरील बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.

| | |
|---|---|
| गट १ बिंदू क्रमांक | १ ते २५ |
| गट २ बिंदू क्रमांक | २६ ते ५० |
| गट ३ बिंदू क्रमांक | ५१ ते ७५ |
| गट ४ बिंदू क्रमांक | ७६ ते १०० |

बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असून, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदू निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा. एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरूवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

जरी बिंदू क्रमांक १,२६,५१,७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांनी घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव उमेदवाराचा

समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदूंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना “प्रपत्र अ” सोबत देण्यात आला आहे.

**८. दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे** :-

(१) एखादया भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा. ती जागा इतर कोणत्याही उमेदवारांमधून भरण्यात येऊ नये. जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी. अंतर्गत परिवर्तनातून पद भरती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समजावे. अंतर्गत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे. वरीलप्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणण्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करण्यात येईल व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगांसाठी विहित आरक्षणानुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवावे. असे करताना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

९. **दिव्यांग व्यक्तींचा समावेश** :- दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. जसे अनुसूचित जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहित केलेल्या बिंदूवर समाविष्ठ करावे तसेच अनुसूचित जमातीचा उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदूवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदूवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदूवर दर्शविण्यात यावा. परंतू जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदूवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदूवर त्याचा समावेश करण्यात येवू नये.

**१०. पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सुट देणे :-** दिव्यांगासाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात

आलेल्या अटी व शर्तीमध्ये सुट देऊन करता येईल. परंतु असे करताना विहित अपंगत्वाच्या प्रमाणात कोणतीही सुट देता येणार नाही. सुट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

**११. मागणीपत्र सादर करतांना निवड प्राधिकरणास सादर करावयाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या “प्रपत्र ब” मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत करावे. तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवार दिव्यांगासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीत अपंगत्व असल्याची खात्री करून आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असल्याचीही खातरजमा करील.

१२. केंद्र शासनाने दि. १५.०१.२०१८ च्या कार्यालयीन आदेशात दिव्यांगांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ठेवलेली नाही. परंतु दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मध्ये संबंधित राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करत आले आहे. केंद्र शासनाने सन १९९८ मध्ये दिव्यांगांना गट क व ड च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण दिले होते. राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी दिनांक ५/०३/२००२ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तेव्हा गट क व ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उक्त तरतूद जशीच्या तशी सुरू राहतील. गट अ व ब च्या पदावरील पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या निर्णयानंतर यथावकाश घेण्यात येईल.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१४४२२८४९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.29 14:59:30 +05'30'

**( टि.वा.करपते )**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२

२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई- ३२
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुबई-३२
१९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र अ**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पद भरतीची माहिती ठेवण्यासाठी

बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेशन क्रमांक | बिंदू क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहित दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे काय | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क, (ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र - ब**

**मागणीपत्रासोबत सादर करण्याचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक --- वरील चक्री क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील ----- इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे.

सक्षम नियुक्ती प्राधिकारी